**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-११**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-१९/११/२०१२

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. ११ शुक्रवार दि. २३/११/२०१२ रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**शुक्रवार दिनांक- २३ /११/२०१२ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ५२ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ९ बुधवार दिनांक १७/१०/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ५३ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदावर सहामहिन्याकरिता अटी व शर्तीनुसार दरमहा मानधन रूपये ३५,०००/- फक्तचे मानधनावर तीन पदांचे करारबध्द नियुक्ती करिता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखतीसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५४ | अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बससेवा प्रवासी भाडे दरात डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा अहमदनगर या मे.प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन्स प्रा.लि. यांचे पत्राप्रमाणे प्रस्तावीत प्रवासी भाडे दर वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव. |
| ५५ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक पदांवर अटी व शर्तीनुसार केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५६ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री पदांवर अटी व शर्ती नुसार केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ५७ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्तीनुसार केलेल्या मानधनावरील करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५८ | अहमदनगर महानगरपालिकेचे श्री. छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल मा. बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ यांना प्रकल्प कार्यालयासाठी दरमहा भाडे रूपये ४५००/- घेउन पांच वर्ष मुदतीसाठी भाडे कराराने देण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५९ | अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची जा.नं. आस्था.४६२०दि.६/११/२०१२ अन्वये दिनांक १२/९/२०१२ पासून सहा महिन्याकरिता केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेस व त्यांना देण्यांत येणारे दरमहा मानधन रूपये १५०००/- ऐवजी रूपये २५०००/- करून रूपये पंचवीस हजार फक्तचे मानधन त्यांना केव्हापासून अदा करावे अशाबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ६० | अर्जदार श्री. सखाराम बन्सी घोडके , रा. सर्व्हे नं.२१६/३ प्लॉट नं.१७ यांचे वॉर्ड क्रमांक ३३ या मिळकतीचे बील क्रमांक ५८१ वरील डबल ओपन प्लॉटची सन २००५ ते २०१३ अखेर केलेली कर आकारणी रककम रू.६०४६/- ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६१ | अहमदनगर महानगरपालिकेचे सार्व.बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ. मुळे स्नेहल राजेंद्र यांची अटी व शर्तीनुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरिता दरमहा मानधन रूपये २०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- १] विषय क्र. ५२ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ९ बुधवार दिनांक १७/१०/२०१२ रोजीच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- ५३ ते ६१ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक ११**

विषय क्रमांक- ५२ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ५२ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ बुधवार दिनांक १७/१०/२०१२ रोजी सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ बुधवार दिनांक १७/१०/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती :- मागील सभा दिनांक १७/१०/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री.जगताप नि. वि.:- मागील सभा दिनांक १७/१०/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ बुधवार दिनांक १७/१०/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक ९ बुधवार दिनांक १७/१०/२०१२ रोजी सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.श्री. जगताप नितीन विलास सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक ११**

विषय क्रमांक- ५३ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ५३ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदावर सहामहिन्याकरिता अटी व शर्तीनुसार दरमहा मानधन रूपये ३५,०००/- फक्तचे मानधनावर तीन पदांचे करारबध्द नियुक्ती करिता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखतीसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना जा.क्र. २०६ दि.२०/१०/२०१२

विषय- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदांवर अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखतीसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणे बाबतचा प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत.

संदर्भ :- १] कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह जा.क्र. ४८६ दि.२१/८/२०१२ अन्वयेचा प्रस्ताव.
२]कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह जा.क्र.५२४ दिनांक२७/८/२०१२अन्वयेचा प्रस्ताव

सादर,

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी संदर्भिय क्रमांक १ च्या कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह ४८६ दिनांक २१/८/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे रोज होणा-या मेजर व मायनर ऑपरेशन करीता भुलतज्ञांची आवश्यकता असते. भुलतज्ञांचे पद आस्थापना सुचीवर नाही त्याकरीता सध्या प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रू.५००/- व प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रू.२५०/- प्रमाणे शहरातील इच्छुक भुलतज्ञांची पॅनलशिप पध्दतीने मानधनावर नेमणूक करण्यांत आलेली आहे. परंतु पॅनलशिपवर नेमलेले भुलतज्ञ हे कॉल केल्यानंतर दवाखान्यामध्ये हजर होतात कधी कधी कॉल करून देखील पॅनलशिपवर भुलतज्ञ दुस-या दवाखान्यामध्ये व्यस्त असल्याने इमर्जन्सीमध्ये उपलब्ध होत नाही असे प्रकार दगावण्याची शक्यता असते व पर्यायाने रूग्णास इतर दवाखान्यांमध्ये शिफ्ट करावे लागते. वरील सर्व बाबींचा विचार केल्यास दवाखान्यासाठी कंत्राटी पध्दतीने तीन भुलतज्ञांची मानधनावर नेमणूक करणे आवश्यक वाटते. पॅनलशिपवर नेमलेल्या भुलतज्ञांची नेमणूक केल्यास २४ तास दवाखान्यामध्ये भुलतज्ञ उपलब्ध राहतील हॉस्पीटलच्या वेळात ते हॉस्पीटलमध्येच असल्याने इमर्जन्सीच्या वेळेस त्वरीत उपलब्ध होतील. रूग्णाचे तातडीने सिझेरियन ऑपरेशन वेळेवर होउन रूग्णांना ते फायदेशीर ठरेल. वरील प्रमाणे कै.बा.दे.दवाखान्यासाठी तीन भुलतज्ञांची रू.२५०००/- दरमहा मानधनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे बाबत. " नमुद करून सुचित केलेले आहे.

सदर प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी सदर कंत्राटी भुलतज्ञ डॉक्टर नियुक्ती करणेस उचित वाटते व त्यांचे दरमहा मानधन रूपये ३५०००/- करणे बाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

तद्नंतर संदर्भिय क्रमांक २ च्या कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह जा.क्र. ५२४ दिनांक २७/८/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये 'कै.बा.दे.दवाखाना करीता कंत्राटी करारा नुसार भुलतज्ञांची नेमणुकी करीता उमेदवारांची शैक्षणीक पात्रता M.B.B.S. D.A. किंवा M.D./DNB (Anaesthesia) अशा स्वरूपाची असणे आवश्यक आहे.." असे नमुद करून सुचित केलेले आहे.

अ.नगर मनपामध्ये कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे अत्यावश्यक सेवेकरीता भुलतज्ञ ही पदे आस्थापना कायम सुचीवर मंजुर नाहीत. त्यामुळे कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्क सेवेसाठी वेळोवेळी यापुर्वी पॅनलशिपवर कंत्राटी करारानुसार भुलतज्ञांच्या करारबध्द नियुक्त्या करण्यांत येत आहेत.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दिनांक १२/१/२०११ व मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ४५ दिनांक २३/९/२०११ च्या मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदांवर डॉ.सौ. सायंबर व इतर १६ असे एकुण १७ भुलतज्ञ यांची पॅनलशिपवर प्रत्येक मेजर ऑपरेशनसाठी रूपये ५००/- व मानयनर ऑपरेशनसाठी रूपये २५०/- यावर दिनांक ६/१/२०११ ते ५/१/२०१४ अखेर तीन वर्षा करीता अटी व शर्ती जा.क्र. आस्थापना ३६२० दि.४/२/२०११ व जा.क्र. आस्था. २१४८ दिनांक २९/१०/२०११ अन्वये करारबध्द नियुक्त्या करण्यांत आलेल्या आहेत.

संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्श्क सेवेसाठी सदर भुलतज्ञ ही पदे आस्थापना कायम सुचीवर मंजुर नाहीत. उपरोक्त संदर्भिय प्रस्तावामध्ये पॅनलशिपवर नेमलेले भुलतज्ञ हे कॉल केल्यानंतर दवाखान्यामध्ये हजर होतात. कधी कधी कॉल करून देखील पॅनलशिपवर नेमलेले भुलतज्ञ दुस-या दवाखान्यामध्ये व्यस्त असल्याने इमर्जन्सीमध्ये उपलब्ध होत नाहीत. असे प्रकार रात्रीच्या वेळी ब-याच वेळा घडतात त्यामुळे अनेक वेळा रूग्णांना रात्री / दिवसा जिल्हा रूग्णालयामध्ये शिफ्ट करोव लागते व रूग्णांची गैरसोय होते. कंत्राटी पध्दतीने तीन भुलतज्ञांची मानधनावर नेमणूक करणे आवश्यक वाटते पॅनलशिपवर नेमलेल्या भुलतज्ञांची नेमणूक केल्यास २४ तास दवाखान्यामध्ये भुलतज्ञ उपलब्ध राहतील हॉस्पीटलच्या वेळात ते हॉस्पीटलमध्येच असल्याने इमर्जन्सीच्या वेळेस त्वरीत उपलब्ध होतील. रूग्णांना ते फायदेशिर ठरेल असे मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी असे सुचित केलेले आहे.

तसेच सदरच्या प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी भुलतज्ञ यांचे दरमहा मानधन रूपये ३५०००/- करणे उचित राहील तसेच जा.क्र. कै.बा.दे.दवाखाना ५२४ दिनांक २७/८/२०१२ च्या प्रस्तावामध्ये सदर नेमणुकी करीता उमेदवाराची शैक्षणिक पात्रता M.B.B.S.D.A. किंवा M.D./DNB (Anaesthesia) अशा स्वरूपाची असणे आवश्यक आहे असे सुचित केलेले आहे.

त्यामुळे उपरोक्त संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदांवर सद्यस्थितीमध्ये सहा महिन्या करिता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर तातडीने अत्यावश्यक सेवेचा विचार करता अंतर्गत विशेष बाब म्हणून करारबध्द नियुक्ती करून भरणे बाबत निर्णय झाल्यास वर्तमान पत्रामध्ये थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार उमेदवारांच्या मुलाखती मा.निवड समिती मार्फत घेवुन कार्यवाही करावी लागेल. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | पदसंख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता | दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | भुल तज्ञ | ३ | एम.बी.बी. एस.डी.ए. किंवा एम.डी. / डी.एन.बी. (Anaesthesia) | ३५,०००/- |

वरील दर्शविलेल्या तक्त्या मधील तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदी कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सद्यस्थितीमध्ये सहा महिन्याकरीता करारबध्द नियुक्तीसाठी निर्णय झाल्यास दरमहा रूपये १,०५,०००/- इतका व सहा महिन्यांचा एकुण अंदाजे खर्च ६,३०,०००/-(अक्षरी रू. सहा लाख तीस हजार) इतका खर्च अपेक्षित होईल.

यापुर्वी अ.नगर महानगरपालिकेमधील अत्यावश्यक सेवेच्या विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवरील कंत्राटी करारानुसार करारबध्द मानधनावरील नियुक्तीबाबत उमेवारांचा अत्यंत अल्पशा प्रमाणात प्रतिसादामुळे सदर जाहिरातीमधील शासकीय नियमानुसार वयोमर्यादा बाबतची अट ही शिथिलते बाबत निर्णय होवून मानधनावर करारबध्द नियुक्तीबाबत निर्णय झालेला आहे.

त्यामुळे यापुर्वी कंत्राटी करारबध्द नियुक्तीकरीता उमेदवारांचा अत्यंत अल्पशा प्रमाणात प्रतिसाद पाहाता वरील तक्त्यांत दर्शविलेली तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदांवर कंत्राटी करारानुसार करारबध्द नेमणुकी बाबत निर्णय झाल्यास सदर वयोमर्यादेची अटी ही जाहिरातीमधील अटी व शर्तीमधुन वगळावी लागेल.

मा.प्र.वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे. दवाखाना यांचे वरील संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा.दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तातडीने तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या तीन पदांवर कंत्राटी करारानुसार सद्यस्थितीमध्ये सहा महिन्याकरिता मानधनावर वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे भरणे बाबत कार्यवाही करावयाची झाल्यास दर्शविल्यानुसार आस्थापना कायम सुचीवर भुलतज्ञ ही पदे मंजुर नाहीत व सदर प्रारूप आकृतीबंधामध्ये ही भुलतज्ञ या पदांची शैक्षणिक पात्रता दर्शविलेली नाही तसेच सदर कालावधीतील मानधन वरील खर्चास ही मा.स्थायी समितीची पुर्व मंजूरी घेवुन सदर उपरोक्त प्रकरणी कार्यवाही करणे उचित होईल.

तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार व मा. प्र. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बा.दे. दवाखाना यांचे संदर्भिय दिनांक २१/८/२०१२ व दिनांक २७/८/२०१२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बा.दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता तातडीने वरील तक्त्या दर्शविल्या प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदांवर कंत्राटी करारानुसार सद्यस्थितीमध्ये सहा महिन्याकरिता नमुद केलेल्या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्ती करणेबाबत निर्णय झाल्यास थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार उमेदवारांच्या मुलाखती करीता वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणेस व सदरची अटी व शर्ती बाबतची जाहिरात अहमदनगर महानगरपालिकेच्या w.w.w.amc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करून उमेदवारांची करारबध्द नियुक्ती करिता पुर्व मंजुरीसाठी सदचा प्रस्ताव निर्णयाकरीता सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभपती साहेब :- मनपाचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सहा महिन्याकरिता मानधनावर भुलतज्ञांची नेमणूक करणे कामी थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखतीसाठी जाहिरात प्रसिध्दीस देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- मनपा दवाखान्यामध्ये सध्या भुलतज्ञ आहेत. की नाहीत.

वैद्यकीय अधिकारी डॉ. श्री. राजूरकर :- मनपाचे कै.बा.दे. दवाखान्याचे अत्यावश्यक सेवेकरिता भुलतज्ञांचे पॅनेलवर भुलतज्ञांची नेमणूक केलेली आहे. परंतु सदर भुलतज्ञ हे वेळेवर उपलब्ध होत नाहीत. अत्यावश्यक सेवेकरिता कॉल दिले नंतर ते यावेच असे बंधन नसते. बीडीसीडी मध्ये महिन्याला १५० ते २०० ऑपरेशन होतात भुलतज्ञांना आपण मेजर ऑपरेशन व मायनर ऑपरेशन करिता ठरले प्रमाणे रू.५००/- व ३००/- देतो. कॉल केले नंतर ते कधी कधी नकार देतात.त्यामुळे आपले बीडीसीडी दवाखान्याचे अत्यावश्यक सेवेकरिता कॅन्ट्रॅक्ट पध्दतीने कायम आस्थापना सुचीवर चांगले मानधन देउन तीन भुलतज्ञांचे नेमणूकी करिता प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- त्याना मानधन वेळेवर मिळते का ?

मा.सौ. खरमाळे सं.र. :- मानधन वेळेवर मिळत नाहीत म्हणूनच ते येत नसतील.

मा.उपायुक्त (सा) डॉ. श्री. डोईफोडे साहेब :- त्यांचे मानधन पॅडींग आहे का ?

वैद्यकीय अधिकारी डॉ. श्री. राजूरकर :- मानधन तीन महिन्यातून एकदा देणेत येते. त्यांचे मानधन कमी आहे. अकौंट विभागाकडून उशिर होते.

मुख्य लेखा अधिकारी श्री. शेलार :- मानधन बील देण्यांस मागे उशिर झालेला आहे. सध्या उशिर होत नाही

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ही सिस्टीम बदलावी.

वैद्यकीय अधिकारी डॉ. श्री. राजूरकर :- आपण मानधन कमी देतो.त्यामुळे भुलतज्ञ येण्यास इच्छुक नसतात.

मा.सभापती साहेब :- भुलतज्ञ डॉक्टराचे पॅनलवर नेमणूकी कामी रूपये ३५ ते ४० हजार खर्च होतात. तीन भुलतज्ञांचे नेमणूकी कामी एक लाख पाच हजार खर्च होईल.

वैद्यकीय अधिकारी डॉ.श्री. राजूरकर :- सध्या पॅनलशिपवर वरील भुलतज्ञांचे मंथली मानधनावर ५० ते ६० हजार खर्च होतात.

मा.उपायुक्त (सा) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- आपले प्रशासनास भुलतज्ञांची आवश्यकता आहे. परंतु पॅनलशीप वरील डॉक्टर वेळेत उपलब्ध होत नाहीत.

मा.सौ.खरमाळे सं.र.:- दोन भुलतज्ञांची नेमणूक ठरविलेल्या मानधनावर करण्यांस मंजुरी देण्यांत यावी.

मा.श्री.सातपुते दि.ना.:- मनपाचे कै.बा.दे.दवाखाना अत्यावश्यक सेवेकरिता दोन डॉक्टरांची रू.३५०००/-चे मानधनावर नेमणूक करण्यांस मंजूर देण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार मानधनावर दोन भुलतज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञ या पदावर सहामहिन्याकरिता अटी व शर्तीनुसार दरमहा मानधन रूपये ३५,०००/- (रूपये पस्तीस हजार फक्त )चे मानधनावर २ (दोन) पदांचे करारबध्द नियुक्ती करिता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखतीसाठी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देणेस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-११**

विषय क्रमांक- ५४ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ५४ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बससेवा प्रवासी भाडे दरात डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा अहमदनगर या मे.प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन्स प्रा.लि. यांचे पत्राप्रमाणे प्रस्तावीत प्रवासी भाडे दर वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मो.व्हे. विभाग १४२ दि.२५/१०/१२

विषय- अहमदनगर शहर बससेवा प्रवासी भाडे दरवाढीबाबत.

संदर्भ :- १. अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा, अहमदनगर (अभिकर्ता संस्था) यांचे जा.क्र. ५९ दिनांक १४/०९/२०१२ चे पत्र

२. मा.आयुक्त कार्यालयातील मिटींग दि.२०/०९/२०१२

मा.सादर,

उपरोक्त संदर्भिय पत्र इकडेस प्राप्त झाले असून सदर पत्रात "अहमदनगर महानगरपालिकेने शहर हद्द व हद्दीबाहेर शहरवासीयांच्या सोयीकरीता बांधा, वापरा व मालकी (Build,Operate and Own) या तत्वावर प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन, पुणे यांना अभिकर्ता म्हणून नियुक्त करून दिनांक २४ फेबु.२०११ पासून शहर बससेवा सुरू केली आहे. सदरची बससेवा कार्यान्वीत झाल्यानंतर डिझेलच्या किंमतीमध्ये दोन वेळा वाढ झाल्यामुळे मा.स्थायी समिती, अहमदनगर महानगरपालिका आणि प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, अहमदनगर यांनी त्यावेळी अस्तित्वात असलेल्या प्रवासी भाडे दरामध्ये अत्यल्प म्हणजे एक रूपया (१) ची दरवाढ मंजूर केली. सदरची दरवाढ दि.२१ एप्रिल २०१२ पासून लागू करण्यात आली. त्यानंतर डिझेलच्या दरामध्ये दोन वेळा (दि.२५/०७/१२ ८९ पैसे व दि.१४/०९/२०१२ रोजी रू.६.१२ ) वाढ झाली आहे. सदरची दरवाढ १३.४१% असुन या दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंबरोबरच टायर व स्पेअर्सच्या किंमतीमध्ये सुध्दा किमान १०% ते १२% वाढ होणार आहे. त्यामुळे अभिकर्ताला डिझेल, टायर व स्पेअर्सपाटर्स खरेदीकरिता आतापेक्षा १५% अतिरिक्त आर्थिक बोजा सहन करावा लागणार आहे."

विनंती करण्यांत येत आहे की, सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार सुधारित प्रवासभाडे दरास लवकरात लवकर मा.स्थायी समिती तसेच प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचेकडून मान्यता प्राप्त करून घ्यावी.

सदरचे सुधारित प्रवास भाडे दर महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.एम.व्ही.ए. ०६०४ /१३२८/प्र.क्र.७५ /परि.२ दि.२०/१२/२००५ मध्ये दिलेल्या मर्यादेमध्ये असून त्यामध्ये बालपोषण अधिभार समाविष्ट आहे." असे नमूद आहे.

सदर अनुषंगाने सादर की, अहमदनगर महानगरपालिकेने मा.स्थायी समिती ठराव क्र.१२९ दि.३१/०३/२०१० अनुषंगाने अहमदनगर शहर बससेवा मे. प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन प्रा.लि. या अभिकर्ता संस्थेस १० वर्षाच्या कराराने चालविण्यांस दिलेली आहे. सदर बससेवा दि.२४/०२/२०११ पासून कार्यान्वीत झालेली आहे.

सदर संस्थेस यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव ८८ दि.२६/०२/२०१२ अन्वये प्रति टप्पा रू.१/- याप्रमाणे दरवाढ दिलेली आहे.

संदर्भिय पत्रान्वये दरवाढ द्यावयाची झाल्यास सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे मंजूरीस्तव पाठवावा लागेल. मा.स्थायी समितीच्या मंजूरीनंतर मा. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचेकडे दरवाढीचा प्रस्ताव पाठवावा लागेल. प्राधिकरणाच्या मंजूरी नंतर दरवाढ लागू राहील.

सदर मागणी मा. शासन राजपत्र , गृहविभाग दि.२० डिसेंबर २००५ अधिसुचनेच्या अधिन राहून आहे. संदर्भिय मागणीनुसार पुढीलप्रमाणे दरवाढ होत आहे.

**अहमदनगर शहर बससेवा विद्यमान व प्रस्तावीत भाडे दर तक्ता**

| किलोमीटर | | सध्या लागू असलेले दर | | प्रस्तावीत दर | |
|---|---|---|---|---|---|
| EXCEEDING | NOT EXCEEDING | प्रौढ | मुल | प्रौढ | मुल |
| किमी पेक्षा जास्त | किमी पर्यत | | | | |
| ० | २ | ६.०० | ३.०० | ७.०० | ४.०० |
| २ | ४ | ६.०० | ३.०० | ७.०० | ४.०० |
| ४ | ६ | ७.०० | ४.०० | ८.०० | ४.०० |
| ६ | ८ | ८.०० | ४.०० | ९.०० | ५.०० |
| ८ | १० | १०.०० | ५.०० | १२.०० | ६.०० |
| १० | १२ | ११.०० | ६.०० | १३.०० | ७.०० |
| १२ | १४ | १३.०० | ७.०० | १५.०० | ८.०० |
| १४ | १६ | १४.०० | ८.०० | १६.०० | ८.०० |
| १६ | १८ | १६.०० | ९.०० | १८.०० | ९.०० |
| १८ | २० | १८.०० | १०.०० | २१.०० | ११.०० |
| २० | २२ | २१.०० | ११.०० | २४.०० | १२.०० |
| २२ | २४ | २५.०० | १३.०० | २९.०० | १५.०० |

सदर बाब धोरणात्मक स्वरूपाची व मा. स्थायी समितीच्या अखत्यारीत असल्याने सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे उचित वाटते.

येणेप्रमाणे मो.व्हे. विभागाकडील प्रस्ताव आहे. सदर प्रस्तावावर मेकॅ. इंजिनियर यांनी प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन प्रा.लि. यांचे मागणीनुसार दरवाढ देणेस हकरत नसून सदरची बाब मा. स्थायी समितीच्या निर्णयास्तव ठेवणेबाबत अभिप्राय दिलेला आहे. त्यावर मा.आयुक्त (कर) यांनी सदर संस्थेस मा.स्थायी समितीच्या मंजूरीने दरवाढ केलेली आहे. त्यानंतर मा. शासनाचे दरवाढी बाबत नवीन दर आहे का ? पुर्वीच्या नस्तीसह सादर करणेबाबत आदेश दिल्याप्रमाणे मेकॅ. इंजिनियर यांनी प्रस्ताव फेर सादर केला आहे. त्यानुसार मागील चार महिन्यापूर्वी मा. शासनाने दरवाढ केलेली नाही. अभिकर्ता संस्था मे. प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन्स प्रा.लि. यांना मा. शासन अधिसुचना कं. एम.व्ही.ए. ६०४/१३२८/प्र.क्र. ७५ परि-२ दि.२०/१२/२००५ चा आधार घेवून दरवाढ देण्यात आलेली आहे. मा. शासनाचा दरवाढी संदर्भात नवीन दर नाही. प्रस्तूत दरवाढ वरील अधिसुचनेचा आधार घेवूनच प्रस्तावीत केलेली आहे. सोबत पुर्वीची नस्ती जोडत आहे. व पुढील आदेशार्थ सादर केले आहे. यावर मा.उपायुक्त यांनी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणेकामी सादर केले असता मा. आयुक्त यांनी प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे.

येणेप्रमाणे सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती समोर ठेवण्यात येत आहे.

येणेप्रमाणे मॅकेनिकल इंजिनियर यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- शहर बससेवा प्रवासी भाडे दरात डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा अहमदनगर यांचे प्रस्तावीत प्रवासी भाडे दर वाढ करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. गंधे सु.मो. :- शहर बस सेवेबाबत मी मा.सभापती साहेब यांना निवेदन देते की, शहर बससेवेस भाडेवाढ देण्यापुर्वी खालील गोष्टींचा खुलासा व्हावा.(१) करार करतेसमयी करारातील अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेने शहर बस डेपोसाठी (रात्री व दिवसा) बस लावण्याची जागा व बसची स्वच्छता व धुण्यासाठी योग्य ठिकाणी जागा महानगरपालिकेने आजपर्यत का दिली नाही ? त्याचा खुलासा व्हावा कारण की, वरील बसवाहतुक कंत्राटदारास महानगरपालिकेने जागा न दिल्यामुळे त्यांना खाजगी व्यक्तींची जागा मोठया भाडे तत्वावर घ्यावी लागली व त्याचा तोटयाचा सर्व बोजा महानगरपालिकेवर लावत आहे. (२) शहर बसवाहतुक सेवेसाठी बस सुरूवातीस सुटण्याचे निश्‍चित ठिकाण, जागेची उपलब्धता नसल्यामुळे निश्‍चित होउ शकत नाही. त्यामुळे प्रवाशांना बसचे सुरूवातीच्या ठिकाणी बसण्यास अडचण होते. (३) शेजारच्या जिहयातून मोठया प्रमाणावर बेकायदेशीर रिक्षा नगर शहरात व्यवसाय करीत आहेत. त्याबाबतीत महानगरपालिका प्रशासनाने मा.जिल्हा पोलिस अधिक्षक व शहर वाहतुक अधिकारी यांचेशी कायदेशीर कार्यवाही बाबत योग्य तो पत्रव्यवहार (चर्चा) केली आहे काय ? केली असल्यास त्यांची माहिती आम्हांस द्यावी कारण अवैध वाहतुकीमुळे बससेवेच्या प्रवाशांवर त्याचा परिणाम होउन पर्यायाने बससेवा पुरविण्या-या संस्थेचा तोटा वाढत आहे.(४) मागील सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार बससेवेत दिलेल्या दरवाढीबाबत काही निश्‍चित स्वरूपाची कालमर्यादा ठरविणे गरजेचे आहे. तरी मेहेबान आयुक्त साहेबांनी वरील गोष्टींची पुर्तता तातडीने केल्यास अहमदनगर शहरातील गोरगरीब जनतेवर वारंवार बस दरवाढीचा बोजा पडणार नाही याची दक्षता प्रशासनाने घेणे गरजेचे आहे अन्यथा लोकांच्या (प्रवाशांच्या) रोषास बळी पडावे लागेल व त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.

ताक मागील दरवाढीच्या वेळेस वरील सर्व बाबींचा गांभिर्याने विचार न झाल्यामुळे लोकप्रतिनिधींना वृत्तपत्रामधुन सातत्याने टिकेचा भडीमार सहन करावा लागला आहे. सोबत वरील वृत्तपत्रांचे कात्रण माहितीसाठी सादर करीत आहोत.

मा.सभापती साहेब :- शहर बससेवेच्या ठरविलेल्या अटी शर्ती सांगाव्यात.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- अहमदनगर मनपाने शहर बस वाहतुकीसंबंधी खाजगी अभिकर्ता संस्थेची नियुक्ती करून त्यांचे मार्फत शहरामध्ये प्रवाशी वाहतुक बससेवा चालू केली आहे. अभिकर्ता नेमणूकीचे वेळी ठरविलेल्या अटी शर्ती वाचून दाखवितो.

मा.श्री. सातपुते दि.ना. / मा.श्री. डागवाले कि.आ :- बस सेवेचे मागिल प्रवाशी भाडे दरात वाढ करण्यास मंजूरी दिलेल्या वेळी ठरविलेल्या अटी शर्ती सांगाव्यात.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- त्यावेळी अटी शर्ती ठरविलेल्या नाहीत.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- बस सेवेचे काही बसस्टॉप बंद केले आहेत.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- भाडे वाढ मंजूर करताना मा.स्थायी समिती सभेने केलेला ठराव वाचून दाखववावा त्याप्रमाणे मा.स्थायी समिती ठराव ८ दि.२६/०२/२०१२ सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- आपले ठरावानुसार त्यांना भाडेवाढ दिली आहे. परंतु बस संख्या वाढविणे, बसचे रूट वाढविणेचे ठरले त्याचे काय ?

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे. :- सदर प्रकरणी मा.आयुक्त साहेब यांचेशी चर्चा करून अभिकर्ता संस्थेस कळविले आहे. परंतु त्यांनी त्या बाबतची पुर्तता केलेली नाही.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- गुलमोहर रोड वर बससेवा चालू करावी तसेच तारकपुर मार्गे ही बस चालू करावी.केडगावला ऑफिस वेळेस बस सुरू करावी.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- शहर बस प्रवासी वाहतुकीसाठी तीस बस सुरू करणेबाबत ठरविले परंतु बस उभ्या करण्यासाठी जागा मिळणे बाबत त्यांची मागणी आहे. आपण त्यांना अमरधाम जवळील जागा दिली होती परंतु ती त्यांना पसंत पडली नाही तेथे बस बसत नव्हत्या.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- नगररचना विभागाने जागा दिली पाहिजे.

मा.श्री. भोसले ग. पुं . :- मनपाचा बुरूडगांव रोडवरील कचराडेपोची जागा आपल्या ताब्यात आहे ती का देत नाही.

मॅके. इंजि. श्री. निकम पी.जे.:- टि.पी. ऑफिसने सदर बाबत कार्यवाही करणे आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- बसची संख्या वाढवावी बसचे रूट वाढवावे त्याची पुर्तता केले नंतर त्यांना भाडेवाढ देण्यात यावी.आवश्यक्तेनुसार विनायकनगर बुरूडगांव रोड भागात बससेवा सुरू झ ाली पाहिजे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- शहर बससेवा भाडे दरात वाढ केल्याने त्यांचा किती फायदा होईल. अभिकर्ता संस्था आपल्या अटी शर्ती पाळीत नाहीत त्यांचेशी चर्चा करणे महत्वाचे आहे. त्यांना सभेत बोलवावे. दरवाढीबाबत शासनाचे काय नियम आहेत.

मा.श्री. कोतकर सु.स. :- बससेवा अभिकर्ता संस्थेचे संचालक आले नंतर या विषयावर चर्चा करावी.

मॅके.इंजि.श्री. निकमी पी.जे. :- अभिकर्ता संस्थेचा प्रतिनिधी श्री. दिपक मगर आलेले आहेत दरवाढ स्लॅब प्रमाणे वाढविता येते.

मा.सभापती साहेब :- त्याना सभेत बोलवावे.

त्याप्रमाणे शहर बस सेवा अभिकर्ता संस्थेचे प्रतिनिधी श्री. दिपक मगर हे सभेमध्ये हजर झाले.

मा.श्री. जगताप नि.वि. :- तीस बस चालू करणेचे ठरले होते. गुलमोहर रोड औरंगाबाद रोड केडगाव भागात बससेवा सुरू करावी.

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- शहर बस सेवा अटी शर्ती नुसार तीस बस चालू करणेबाबत ठरले प्रमाणे आम्ही टप्पा टप्पाने बस चालू करणार आहोत आता सध्या २३ बस चालू आहेत.

मा.सभापती साहेब :- तीस बस कधी चालू होणार.

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- सात नवीन बसचा प्रस्ताव आम्ही सादर केलेला आहे. बसेच नवीन रूट ही ठरविले आहेत. परंतु ते गावाबाहेरचे आहेत बस संख्या वाढविणे आर्थीक बाबींशी निगडीत आहे. बससेवा सुरू घेउन १९ महिने झाले आहेत. संस्थेस ६५ लाखाचा तोटा आहे आम्ही इतर ठिकाणाहून बस आणून त्या चालवीत आहोत.

मा.सौ. कराळे आ. शि. :- २३ बस चालू आहेत का ?

प्रतिनिधी श्री.दिपक मगर :-होय चालू आहेत आम्ही भाडेवाढ मागितली त्यात एक रूपया वाढ दिली आहे.

मा.सभापती साहेब :- एस.टी. ची भाडेवाढ झाली का ?

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- त्याची भाडे वाढ दोन वेळेस झालेली आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- पुण्यास ज्या प्रमाणे भाडे दर आहे तसे करावे. तुम्ही जास्त भाडेवाढ मागतिली तर कशी देणार

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- त्याप्रमाणेच आहे. एक रूपया भाडेवाढ ही अत्यंल्प आहे.

मा.श्री. जगताप नि.वि. / मा.श्री. डागवाले कि.आ. :- आपले अटी शर्ती प्रमाणे बसची सोय करावी. बस रूट वाढवावे.

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- एक महिन्यात नविन बस रूट चालू करू आम्हाला बस ठेवण्यासाठी जागा मिळाली नाही.

मा.सभापती साहेब :- टि.पी. ऑफिसचे श्री. बल्लाळ इंजि. यांना सभेत बोलवावे.

त्याप्रमाणे श्री. बल्लाळ इंजि. यांचे सभेमध्ये हजर झाले.

मा.श्री. जगताप नि.वि. :- औरंगाबाद रोड पाईप लाईन रोड केडगाव भागात बससेवा सुरू करावी तद्नंतर भाडेवाढ करावी. भाडेवाढ देण्यास आमची हरकत नाही. परंतु अटी शर्ती प्रमाणे कार्यवाही करावी गुलमोहर रोडला बससेवा नाही.

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- गुलमोहर रोड भागात बस चालू केली होती. पंरतु प्रवाशा अभावी ती बंद केली. जीथे ट्रॉफीक जास्त आहे. तेथेच बस चालविली जाते.

मा.श्री. खरमाळे सं.र. :- दिवसातून दोन वेळा म्हणजे मुलाच्या शाळा भरण्याचे व सुटण्याचे वेळी गुलमोहर रोड वरील बस सेवा चालु करावी ५० पैसे व एक रूपया भाडेवाढ करावी.

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- अवैध रिक्षा बंद झाल्या पाहिजे. माळीवाडा ते इंजि.कॉलेज रूपये १३/- होते ते आता रू.१५/- बसभाडे दर होणार आहे. आम्ही स्मार्ट कार्डची सोय केली आहे. ती काढली तर त्यावर २० % सवलत मिळते.

मा.सभापती साहेब :- ३० बस कधी सुरू करणार एम.आय.डी.सी. ची रात्रीची शिफ्ट सुटते तेव्हा बस चालू करावी.

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- त्याबाबत आम्ही एम.आय.डी.सी. भागातील कंपनी व्यवस्थापक व कामगार यांना भेटलो होतो. त्यांनी आमचे स्मार्ट कार्ड घ्यावे बससेवा सुरू करू आम्ही नो लॉस नो प्रॉफीट या बेसीस वर बस सेवा चालवीत आहोत.एम.आय.डी.सी. ची शेवटच्या बस ची वेळ रात्री ९.३०ची आहे. त्यांनी तीस स्मार्ट कार्ड घेतल्यास रात्रीचा बस चालू करू.

मा.सभापती साहेब :- तीसचे तीस बस कधी सुरू करणार ते सांगावे.

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- तीस बस ३१ जानेवारी पर्यत वाढवू

मा.श्री. जगताप नि.वि. :- त्याचे त्याप्रमाणे लेखी घ्यावे. भाडेवाढ देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- अहमदनगर बससेवा अभिकर्ता संस्थेस जागा देणे बाबत ठरले त्याचे काय झाले कचराडेपोची जागा आपले ताब्यात आहे. तीचा विचार करावा.

इंजि.श्री. बल्लाळ के.वाय. :- आम्ही त्याना वारूळाचे मारूती येथील जागा दाखविली होती. ती देउ बुरूडगांव रोड कचरा डेपोचे जागेवर आरक्षण आहे.

प्रतिनिधी श्री. दिपक मगर :- वारूळाचा मारूती येथील जागा लांब आहे. तेथे आम्हास वॉचमनची सोय करावी लागेल त्या रस्त्यामध्ये नदी आहे ती पलीकडे ही जागा आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- प्रेमदान ते गुलमोहर रोड तारकपुर ते गुलमोहर रोड अशी बस चालू करावी.

मा.श्री. भोसले. ग.पुं. :- बुरूडगांव ते एस.टी.स्टॅण्ड ,केडगांव, नेप्ती नगर अशी बस चालू करावी भाडेवाढ देण्यास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. जगताप नि.वि. :- तीस बस चालू कराव्या नविन रूट चालू करावे अशा बाबत अहमदनगर शहर बस वाहतुक अभिकर्ता संस्था यांचे लेखी घेउन्न त्यांना भाडेवाढ करण्यांस ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री.सातपुते दि.ना.:- भाडेवाढ करणेस मंजूरी देणेत यावी अभिकर्ता संस्थेने बस संख्या तीस पर्यत वाढवावी नविन बस रूट सुरू करावे.

मा.सभापती साहेब :- अभिकर्ता संस्था यांनी तीस बस सुरू करणे तसेच केडगांव ,विनायकनगर , बुरूडगांव ते एस.टी.स्टॅण्ड , तारकपुर , गुलमोहर रोड , प्रेमदान हॉटेल ते गुलमोहर रोड , एम.आय.डी.सी. करिता रात्री १२.०० वा. चे शिप्ट करिता या मार्गावर तसेच बससेवा सुरू करणेबाबत लेखी घेउन्न सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बससेवा प्रवासी भाडे दरात डिझेल टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवा अहमदनगर या मे.प्रसन्ना पर्पल मोबिलीटी सोल्युशन्स प्रा.लि. यांचे पत्राप्रमाणे प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढ करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

मात्र अभिकर्ता संस्थेने करारनाम्यानुसार तीस (३०) बसेस ३१ जानेवारी पूर्वी चालू कराव्यात. तसेच खालील मार्गही चालू करणे बाबत लेखी घेण्यात यावे.

१] केडगाव-विनायकनगर -बुरूडगांव रोड-एस.टी. स्टॅण्ड

२] प्रेमदान हॉटेल ते गुलमोहर रोड

३] तारकपुर मार्फत गुलमोहर रोड

४] एम.आय.डी.सी. करिता रात्री १२.०० वाजेपर्यत बसेस चालू ठेवावी.

मनपाचे नगररचना विभागाने तातडीने बसडेपो करिता जवळपास जागा उपलब्ध करून दयावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :- मा.श्री. जगताप नितीन विलास सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-११**

विषय क्रमांक- ५५ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ५५ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर माहनगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक पदांवर अटी व शर्तीनुसार केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र. २१२ दि.३१/१०/२०१२

विषय- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक पदांवर अटी व शर्तीनुसार केलेल्या करारबध्द माननधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

विनंती की,मा. मॅकेनिकल इंजि.पा.पु.विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र.शहर पाणीपुरवठा योजना ८१८दि.६/१०/१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार नमुद तांत्रिक हुद्दाप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात पदांवर दि.१०/४/२०१२ रोजी पासून ६ महिन्याकरिता निर्देशित अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूक करण्यांत आलेल्या आहेत. संदर्भिय आदेशातील पाणी पुरवठा विभागाकरिता नियुक्त केलेले सर्व कर्मचारी या विभागाकडे हजर झाल्यानंतर सर्वाची अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवझ योजनेवर निर्देशित ठिकाणी नेमणूक करण्यात आलेली आहे. परंतु कंत्राटी करारानुसार नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.११/१०/२०१२ रोजी पुर्वी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे मुदतवाढ मिळणे नमुद कर्मचारी यांनी दि.१८/०९/२०१२ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे. पाणी पुरवठा विभागाकरिता मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने नमुद केलेल्या तांत्रिक हुद्दाप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात पदांवर मुदतवाढ देणे बाबत सुचित केलेले आहे.

यापुर्वी पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता दर्शविलेल्या उमेदवारांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक३४दि.०४/०४/२०१२अन्वये दि.१२/४/२०१२पासून सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे नमुद दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेल्या होत्या.

सदरच्या अटी व शर्ती नुसार केलेल्या सहा महिन्याच्या कालावधीतील कंत्राटी करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत समाप्त झालेली होती.

सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक विभागाकरीता आस्थापना कायम सूची वरील मंजूर असलेली तांत्रिक पदे ही बहुतांशी रिक्त झालेली असुन सदरची तांत्रिक पदे ही रिक्त असल्यामुळे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरिता मा.मॅकेनिकल इंजिनियर, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे उपरोक्त अहवालाच्या अनुषंगाने नमुद केलेल्या कर्मचा-यांची खास बाब म्हणून पाणी पुरवठा वितरण हा नागरिकांच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाच्या आहे त्यामुळे पाणी पुरवठा विषयक गंभीर परिस्थितीचा विचार करता पाणी पुरवठा विभाग जा.क्र.८१८ दि.६/१०/२०१२ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे तांत्रिक खंड देवून तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार दिनांक २५/१०/२०१२ पासून सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्त्या करण्यांत आलेल्या आहेत.

| अ.नं | उमेदवारांचे नांवे | तात्पुरत्या स्वरूपात हुद्दा | दर महा मानधन | आस्था ./ कंत्राटी करारबध्द नेमणूक जा.क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ६०००/- | ४३८४/ दि.२३/१०/२०१२ |
| २ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ६०००/- | ४३८४/ दि.२३/१०/२०१२ |
| ३ | गोरे कवि दशरथ | पंपचालक | ६०००/- | ४३८४/ दि.२३/१०/२०१२ |
| ४ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ६०००/- | ४३८४/ दि.२३/१०/२०१२ |
| ५ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ६०००/- | ४३८४/ दि.२३/१०/२०१२ |

तरी वरीलप्रमाणे पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरूपात पदांवर कंत्राटी करारानुसार सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून केलेल्या करारबध्द मानधना वरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मनपाचे पाणीपुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार पंपचालक पदावर अटी व शर्ती नुसार केलेल्या मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. गायकवाड नि.व.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. जगताप नि.वि.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर माहनगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक पदांवर अटी व शर्तीनुसार दिनांक २५/१०/२०१२ पासून सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंतराव सही /-

अनुमोदक :- मा.श्री. जगताप नितीन विलास सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-११**

विषय क्रमांक- ५६ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ५६ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर माहनगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विज तंत्री पदांवर अटी व शर्तीनुसार केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र. २११ दि.३१/१०/२०१२

विषय- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विज तंत्री पदांवर अटी व शर्तीनुसार केलेल्या करारबध्द माननधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

विनंती की, मा. मॅकेनिकल इंजि. पा.पु. विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा योजना ८३७ दि.२४/९/१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार नमुद तांत्रिक हुद्दाप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात पदांवर दि.२३/४/२०१२ रोजी पासून ६ महिन्याकरिता निर्देशित अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूका करण्यांत आलेल्या होत्या.

परंतु कंत्राटी करारानुसार नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.२३/१०/२०१२ रोजी पुर्वी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे मुदतवाढ मिळणे नमुद कर्मचारी यांनी दि.०३/१०/२०१२रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे. सदर अर्ज आपले माहितीस व पुढील कार्यवाही असे नमुद करून सुचीत केलेले आहे.

यापुर्वी पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता दर्शविलेल्या उमेदवारांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक १५५दि.२३/०४/२०१२अन्वये सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे नमुद दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेल्या होत्या.

सदरच्या अटी व शर्ती नुसार केलेल्या सहा महिन्याच्या कालावधीतील कंत्राटी करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत समाप्त झालेली होती.

सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक विभागाकरीता आस्थापना कायम सूची वरील मंजूर असलेली तांत्रिक पदे ही बहुतांशी रिक्त झालेली असुन सदरची तांत्रिक पदे ही रिक्त असल्यामुळे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरिता मा.मॅकेनिकल इंजिनियर, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे उपरोक्त अहवालाच्या अनुषंगाने नमुद केलेल्या कर्मचा-यांची खास बाब म्हणून पाणी पुरवठा वितरण हा नागरिकांच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाच्या आहे त्यामुळे पाणी पुरवठा विषयक गंभीर परिस्थितीचा विचार करता पाणी पुरवठा विभाग जा.क्र.८३७ दि.२४/९/२०१२ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे तांत्रिक खंड देवून तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार दिनांक ३०/१०/२०१२ पासून सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्त्या करण्यांत आलेल्या आहेत.

| अ नं | उमेदवारांचे नांवे | तात्पुरत्या स्वरूपात हुद्दा | दर महा मानधन | आस्था ./ कंत्राटी करारबध्द नेमणूक जा.क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.सागर आसाराम खताडे | विज तंत्री | ६०००/- | ४३८३ दि.२३/१०/२०१२ |
| २ | श्री. नितीन किशोर हुशारे | विज तंत्री | ६०००/- | ४३८३ दि.२३/१०/२०१२ |

तरी वरीलप्रमाणे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरूपात पदांवर कंत्राटी करारानुसार सहामहिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून केलेल्या करारबध्द मानधना वरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेकरीता अटी व शर्ती नुसार विजतंत्री या पदांवर केलेल्या माधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.जगताप नि.वि.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर माहनगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विज तंत्री पदांवर अटी व शर्तीनुसार दिनांक ३०/१०/२०१२ पासून सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. जगताप नितीन विलास सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-११**

विषय क्रमांक- ५७ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ५७ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्तीनुसार केलेल्या मानधनावरील करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र. २१० दि.३१/१०/२०१२

विषय- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत.

सादर,

विनंती की, मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी बा.दे. दवा यांनी त्यांचे कडील जा.क्र.कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह ५७३ दिनांक १३/९/२०१२ अन्वेय प्रस्ताव करून त्यामध्ये "कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता नेहमी भासते. आस्थापना सुचीवर बालरोग तज्ञाचे पद मंजुर नसल्यामुळे बालरोग तज्ञ डॉक्टरांची (ऑनररी बालरोग तज्ञ म्हणून) मानधनावर नेमणूक करावी लागते. कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे मानद बालरोग तज्ञ म्हणून- १) डॉ.श्री. सुभाष फिरोदिया M.D., २) डॉ.श्री. अनिरूध्द गिते M.D., ३) डॉ.श्री. सुचित तांबोळी MBBBS, DCH,PGD,MLS, यांची जा.क्र. आस्था./कंत्राटी करार नेमणूक ३३०९ दिनांक १५/०२/२०१२ अन्वये दरमहा १५००/- च्या मानधनावर दिनांक २९/१२/२०११ ते दि.२८/०६/२०१२ रोजी संपली आहे. परंतु डॉ. श्री. सुभाष फिरोदिया यांची अंब्रेला सोसायटी आर.सी.एच. फेज-२ विभागामार्फत बालरोग तज्ञ म्हणून नेमणूक करण्यांत आलेली आहे. डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी बालरोग तज्ञ यांनी त्यांची मुदत संपत आल्यामुळे कै.बा.दे. दवाखानामध्ये मानधनावर रूग्णांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी पुढील काळासाठी नेमणूक चालू ठेवण्या बाबत विनंती अर्ज दिलेले आहेत. वरील बालरोग तज्ञ दवाखान्यातील नवजात अर्भकांची तपासणी करून औषधोपचार करतात. त्यामुळे दवाखान्यात येणा-या गरीब व गरूजु रूग्णांना त्याचा जास्तीत जास्त फायदा होतो. आपल्या दवाखान्यामध्ये प्रामुख्याने बांळत केसेस असल्याने बालरोग तज्ञ असणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून हॉस्पीटलची व पर्यायाने पेशंटची गैरसोय होउ नये या करीता डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी या बालरोग तज्ञांची एक दिवसाचा तांत्रिक खंड देउन दि.३०/६/२०१२ ते २९/१२/२०१२ अखेर सहा महिन्याकरिता दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर नेमणूक होणेस विनंती आहे. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचे कडील प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता १) डॉ.श्री. सुभाष फिरोदिया एम.डी., २) डॉ.श्री. अनिरूध्द गिते एम.डी., ३) डॉ.श्री. सुचित तांबोळी एम.बी.बी.एस.डी.सी.एच..पी.जी.डी.एम.एल.एस. यांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी करार नेमणुक ४३८५ दिनांक २३/१०/२०१२ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) या पदावर

नेमणूक आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १५००/- (अक्षरी रूपये एक हजार पाचशे मात्र) या मानधनावर दिनांक ३०/६/२०१२ ते २९/१२/२०१२ अखेर सहा महिन्याच्या कालावधी करीता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञांची अटी व शर्ती नुसार माधनावर केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) यांची अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर दिनांक ३०/६/२०१२ ते २९/१२/२०१२ अखेर सहा महिन्याच्या कालावधी करीता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-११**

विषय क्रमांक- ५८ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ५८ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे श्री.छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ यांना प्रकल्प कार्यालयासाठी दरमहा भाडे रूपये ४५००/- घेउन पांच वर्ष मुदतीसाठी भाडे कराराने देण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मार्केट विभाग जा.क्र. १३३ दि.३१/१०/२०१२

प्रस्तावना-विषय- बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ अ.नगर मा. शासकीय कार्यालयास महानगरपालिकेच्या श्री. छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील हॉल भाडयाने देणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून सदर प्रकरणी अहवाल खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे. मा. बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ अ.नगर यांनी प्रकल्प कार्यालयासाठी इमारत जागा मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. या प्रकल्प कार्यालया अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका झ ोपडपट्टयामध्ये अंगणवाडी केंद्र कार्यरत असुन हया अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातुन झोपडपट्टीत ० ते ६ वर्ष वयोगटातील बालके गर्भवती स्त्रीया, स्तनदामाता, किशोर मुली हया लाभार्थींना १) पुर्वप्राथमिक शिक्षण २) पुरक पोषण आहार ३) आरोग्य तपासणी ४) लसीकरण ५) आहार व आरोग्य शिक्षण ६) संदर्भ सेवा हया सेवा पुरविल्या जातात असे दि.१३/७/२०१२,२७/८/२०१२ व २०/९/२०१२ रोजीच्या दिलेल्या अर्जात नमुद केलेले आहे.

नगररचनाकार अहमदनगर महानगरपालिका यांना सदर जागेचे दरमहा भाडे व अनामत रक्कम निश्चित करून अहवाल देणेबाबत जा.क्र. /मार्केट /१०५ दि.१०/९/२०१२ अन्वये कळविले होते.

नगररचनाकार यांनी बांधलेले हॉलचे क्षेत्र ८९.६८ चौ.मी. आहे व एकुण खुल्या जागेचे क्षेत्र २७२ चौ.मी. इतके आहे. सदर जागेसाठी दरमहा रू.४५००/- इतके भाडे आकारणे योग्य होईल सदर जागा ही शासकीय कार्यालयासाठी भाडयाने देण्यात येणार असल्याने अनामत रक्कम घेण्याची आवश्यकता नाही. असे जा.क्र./टी.पी. /२८२० दि.५/१०/२०१२ ने इकडेस कळविले आहे.

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीमध्ये निर्णयासाठी घेणेबाबत मा.आयुक्त सो., मा.उपायुक्त (कर) यांनी आदेश दिलेले आहे.

सदर आदेशानुसार मा. बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)क्र.२ अ.नगर यांना शासकीय प्रकल्पासाठी श्री.छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील हॉल दरमहा भाडे रू.४५००/-घेउन पाच वर्ष कराराने जागा भाडयाने देणेबाबत मा.स्थायी समितीने निर्णय घेणे योग्य होईल.सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :-मनपाचे श्री. छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ यांना प्रकल्प कार्यालयासाठी भाडेतत्वावर देणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. जगताप नि.वि. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे श्री. छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ यांना प्रकल्प कार्यालयासाठी दरमहा भाडे रूपये ४५००/-(रूपये चार हजार पाचशे फक्त)घेउन पांच वर्ष (५वर्षे )मुदतीसाठी भाडे कराराने देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. जगताप नितीन विलास सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-११**

विषय क्रमांक- ५९ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ५९ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची जा.नं.आस्था.४६२०दि.६/११/२०१२ अन्वये दिनांक १२/९/२०१२ पासून सहा महिन्याकरिता केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेस व त्यांना देण्यांत येणारे दरमहा मानधन रूपये १५०००/- ऐवजी रूपये २५०००/- करून रूपये पंचवीस हजार फक्तचे मानधन त्यांना केव्हापासून अदा करावे अशाबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र. २१९ दिनांक ८/११/२०१२
प्रस्तावना-विषय-नारायण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धापरिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारा नुसार अटी व शर्तीप्रमाणे मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.
सादर,

प्रा. श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांनी दि.१३/८/२०१२ रोजी अर्ज देवुन "मी" आपल्या स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेपासुन २००७ या केंद्रात प्रकल्प संचालकपदी कार्यरत आहे. आजअखेर ३२९ विद्यार्थी या केंद्रातुन यु.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी परिक्षा उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या ३ महिन्यात आपल्या केंद्रातील ५ प्रशिक्षणार्थी पी.एस.आय. ५ प्रशिक्षाणार्थी एस.टी.आय. त्यातील १ महाराष्ट्रात प्रथम, ३ सहाय्यक विक्रीकर उपायुक्त वर्ग-१, १ नायब तहसिदार (महाराष्ट्र मुलीत पाचवी) ३ एम.पी.एस.सी. ,२ यु.पी.एस.सी. पुर्व उत्तीर्ण झालेले आहेत. माझ्या सहा महिन्याचे अंतिम नियुक्ती पत्र जा.क्र. आस्था./कंत्राटी नेमणूक ४३१ दि.३/५/२०१२ ची मुदत दि.६/९/२०१२ रोजी संपली आहे. तरी मला प्रकल्प संचालक पदावर पुनश्च नियुक्ती करून तसेच माझ्या मानधनात डिसेंबर २०१० नंतर कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही तरी मानधनात भरघोस आणि सुयोग्य वाढ करण्यात यावी ही विनंती. असे नमुद केलेले आहे.

त्यानुसार प्र. प्रसिध्दी अधिकारी यांनी प्रा. श्री. मिसाळ हे केंद्र प्रकल्प संचालक म्हणून २००७ पासनू कार्यरत आहे महापालिकेच्या वतीने स्पर्धा परिक्षा केंद्र हे उत्तम उपक्रम म्हणून कार्यरत आहे स्पर्धा परिक्षा केंद्रावर च्या विद्यार्थ्याचा निकाल ही उत्तम आहे. तरी श्री. मिसाळ, स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक यांचे मानधन वाढी बाबत वरीष्ठस्तरावर धोरणात्मक निर्णय घेणे योग्य आहे. असे सुचित केलेले आहे.

तरी प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांच्या दि.१३/८/२०१२ रोजीच्या विनंती अर्जानुसार व प्रसिध्दी अधिकारी यांचे शिफारशीनुसार अहमदनगर महानगरपालिकेमार्फत स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राच्या प्रकल्प संचालक पदावर प्रा.श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी नेमणूक ४६२० दि.६/११/२०१२ अन्वये दि.१२/९/२०१२ पासुन सहा महिन्याकरीता दरमहा रू.१५०००/- या एकत्रित मुशाहि-यावर अटी व शर्ती नुसार केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळो करीता व त्यांना देण्यांत येणा-या दर महा मानधन रू. १५०००/- ऐवजी रू.२५,०००/- करून रू.२५०००/- मानधन केव्हापासून अदा करण्यात यावे याबाबत निर्णयास्तव सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुऐ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची सहा महिन्याकरिता केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देणे व त्यांना देण्यांत येणार मानधनाात वाढ करून मानधन केव्हापासून देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- आपण त्यांना मानधन वाढवून दिले ते कधी दिले.

मा.उपायुक्त (सा.) डॉ. श्री. डोईफोडे साहेब :- त्यांना वर्षापूर्वी मानधन वाढवून दिले आहे पूर्वी दहा हजार होते ते दरमहा रूपये पंधरा हजार केले आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- ते फक्त मॅनेजमेंन्ट करतात मुख्य लेखा परिक्षक यांचे मत काय आहे.

मुख्य लेखा परिक्षक श्री. मेश्राम :- प्रा.श्री. ना.बा. मिसाळ, संचालक स्पर्धा परिक्षा केंद्र अहमदनगर महानगरपालिका यांना दि.७/३/२०१२ पासून सहा महिन्यासाठी म्हणजे दि.६/९/१२ पर्यत रूपये १५०००/-दरमहा मानधनावर नियुक्तीबाबत आदेश झाला आहे. अहमदनगर महागनरपालिकेची आर्थिक स्थीती लक्षात घेता रूपये २५०००/- पर्यत मानधन वाढविणे शक्य वाटत नाही अशाबाबत अभिप्राय दिलेला आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र:- मानधन रूपये २००००/-देणे ठिक आहे. श्री.शेलार साहेब यांचे काय मत आहे.

मुख्य लेखा परिक्षक श्री. मेश्राम : माझ्या मताशी ते सहमत आहेत.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- आपले स्पर्धा परिक्षक केंद्र चांगले आहे त्याचा विद्यार्थांना फायदा होतो सभेने निर्णय घेणे योग्य

मा.श्री. डागवाले कि.आ. :- त्यांना देण्यांत येणा-या मानधनात रूपये ५०००/- वाढवून रूपये २०,०००/- मानधन देण्यात यावे.ऑफिस रिपोर्ट मंजूर कावा.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- रूपये वीस हजार मानधन देण्यात यावे. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- रूपये वीस हजार मानधन देण्यात यावे. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- मनपाचे स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी प्रा.श्री. मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर केलेल्या नियुक्तीस तसेच त्यांना देण्यात येणार मानधन रू.१५०००/- ऐवजी वाढवून ते वीस हजार करून त्याना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्रासाठी श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची जा.नं.आस्था.४६२०दि.६/११/२०१२ अन्वये दिनांक १२/९/२०१२ पासून सहा महिन्याकरिता अटी व शर्ती नुसार केलेल्या कंत्राटी करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच त्यांना देण्यांत येणारे दरमहा मानधन रूपये १५,०००/- ऐवजी रूपये २०,०००/-(रूपये वीस हजार फक्त)करून त्यांना दिनांक १/१२/२०१२पासून देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक : मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-११**

विषय क्रमांक- ६० शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ६० शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. सखाराम बन्सी घोडके , रा. सर्व्हे नं.२१६/३ प्लॉट नं.१७ यांचे वॉर्ड क्रमांक ३३ या मिळकतीचे बील क्रमांक ५८१ वरील डबल ओपन प्लॉटची सन २००५ ते २०१३ अखेर केलेली कर आकारणी रककम रू.६०४६/- ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांव दि.८/११/२०१२

सादर,

विनंती पुर्वक टिप्पणी सादर करण्यात येते की, श्री.सखाराम बन्सी घोडके, रा. दुधसागर सोसा. केडगांव वॉर्ड क्र. ३३, बिल नंबर ५८१,६१८ या मिळकतीच्या नोंद झालेली असुन बिल नं.५८१ या बिलावर ओपन प्लॉट पट्टी व बिल नं.६१८ या बिलावर घरपट्टीची नोंद झालेली आहे. व सन २००३-०७ पर्यत घरपट्टीच्या भरणा केली आहे. अधिकृत नळ कनेक्शनची नोंद व पावती बील नं.५८१ वर जमा करून पावती दिली आहे. व पाणीपट्टी चे बील नं. ५८१ वर जमा करून पावती दिली आहे. पाणीपट्टीची नोंद बिल नं. ५८१ वर येत आहे. ओपन प्लॉची रक्कम रूपये ६०४६/- रद्द (निर्लेखित) करण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार मंजुरीसाठी सविस्तर ऑफिस रिपोर्ट सादर केला असता मा.आयुक्त साहेब यांनी सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी ठेवणेबाबत मंजुरी दिलेली आहे.

तरी श्री. सखाराम बन्सी घोडके रा. दुधसागर सोसा. केडगांव वॉर्ड क्र. ३३,बिल नं. ५८१ सदर मिळकती सन २००५ ते २०१३ अखेर एकुण रक्कम रूपये ६०४६/- निर्लेखित करण्यास सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीची मंजुरी मिळावी ही विनंती.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- श्री.घोडके यांचे मिळकतीस डबल ओपन प्लॅटची केलेली आकारणी निर्लेखित करणेबाबत प्रस्ताव आहे. सदरचे घरपट्टी निर्लेखित करणेबाबत माझेकडेस तक्रार अर्ज आला आहे. मागील वेळी मा.स्थायी समितीने अशा बाबतची सर्व प्रकरणे एका वेळी सभेपुढे निर्णयासाठी ठेवणे बाबत ठरले होते. त्याप्रमाणे कार्यवाही का केली नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- एकाच वेळी घरपट्टी , पाणीपट्टी निर्लेखित करणेबाबतची सर्व प्रकरणे सभेपुढे निर्णयासाठी ठेवण्यात यावीत.

प्रभाग अधिकारी क्र. श्री. तडवी :- घरपट्टी , पाणी पट्टी निर्लेखित करणे बाबतचे प्रकरणी जागा पहाणी करून प्रस्ताव सादर करावयाचे आहेत मा.आयुक्त साहेब यांचेशी चर्चा केली असता अर्जदार यांचे अर्ज आल्याच्या तारखेपासून कर निर्लेखित करणेबाबत बाबत ठरले आहे.

मा.उपायुक्त (सा.) डॉ.श्री. डोईफोडे साहेब :- सर्व प्रभाग अधिकारी यांनी त्याचे प्रभागातील सर्व प्रकरणे एकच वेळी मा. स्थायी समिती सभेपुढे निर्णयासाठी सादर करावीत.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सौ. खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावी. सर्व प्रभाग अधिकारी यांनी त्याचे प्रभागातील सर्व प्रकरणे एकच वेळी मा. स्थायी समिती सभेपुढे निर्णयासाठी सादर करावीत.

**ठराव :-** अर्जदार श्री. सखाराम बन्सी घोडके , रा. सर्व्हे नं.२१६/३ प्लॉट नं.१७ यांचे वॉर्ड क्रमांक ३३ या मिळकतीचे बील क्रमांक ५८१ वरील डबल ओपन प्लॉटची सन २००५ ते २०१३ अखेर केलेली कर आकारणी रककम रू.६०४६/-(रूपये सहा हजार सेहेचाळीस फक्त) ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

मात्र सर्व प्रभाग अधिकारी यांनी त्याचे प्रभागातील सर्व प्रकरणे एकच वेळी मा. स्थायी समिती सभेपुढे निर्णयासाठी सादर करावीत.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-११**

विषय क्रमांक- ६१ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

ठराव क्रमांक- ६१ शुक्रवार दिनांक २३/११/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सार्व.बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ. मुळे स्नेहल राजेंद्र यांची अटी व शर्तीनुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरिता दरमहा मानधन रूपये २०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र. २२१ दि.१९/११/२०१२

विषय- बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी सौ. मुळे स्नेहल राजेंद्र यांची अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेस मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

विनंती की, सौ.मुळे स्नेहल राजेंद्र यांनी दिनांक १२/१०/२०१२ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये "अहमदनगर महानगरपालिकेमध्ये जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १५३ दिनांक २३/४/२०१२ अन्वये माझी नेमणूक कनिष्ठ अभियंता (सिव्हील) म्हणून बांधकाम विभागामध्ये सहा महिन्याकरीता नेमणूक करण्यात आलेली असुन सद्यस्थितीमध्ये मी बांधकाम विभागामध्ये कार्यरत आहे. माझ्या कामकाजाचे सदर आदेशान्वये २३/१०/२०१२ रोजी सहा महिने पुर्ण होत आहेत. माझी महानगरपालिकेमध्ये काम करण्याची इच्छा आहे तरी मला पुढील मुदतवाढ मिळावी. असे नमुद करून विनंती केलेली आहे.

सौ. मुळे स्नेहल राजेंद्र यांच्या उपरोक्त अर्जावर मा. प्र. शहर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा.क्र. सार्व .बांधकाम विभाग ११६० दिनांक १९/१०/२०१२ अन्वये "सौ. स्नेहल मुळे , कनिष्ठ अभियंता यांना महानगरपालिकेतील विकास कामांचे प्रस्तावांना प्रशासकीय मंजुरी प्रदान झालेनंतर तांत्रिक मान्यता घेणेत येते सदरचा अंदाजपत्रक तपासणीचे काम सौ. मुळे यांचेकडे सोपवलेले असुन त्यांचे काम समाधानकारक आहे. सार्व. बांधकाम विभागाकडे विकासकामे करणेसाठी अभियंत्यांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे त्यांना पुढील ६ महिने मुदतवाढ देणे योग्य वाटते. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

मा. प्र.शहर अभियंता, बांधकाम विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. सार्व.बांधकाम विभाग ७० दिनांक २६/४/२०१२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नमुद केल्यानुसार तातडीने तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंताची आवश्यकता असल्याने सुचित केलेले होते.

त्यामुळे अहमदनगर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदावर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबत दिनांक ८/२/२०१२ रोजी दैनिक देशदूत या वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन थेट पध्दतीने (Walk In Interview) नुसार उमेदवारांच्या मुलाखती दिनांक २१/२/२०१२ रोजी आयोजित करण्यांत आलेल्या होत्या.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने मा.आयुक्त तथा अध्यक्ष, निवड समिती, अहमदनगर महानगरपालिका यांचे अध्यतेखाली मा. निवड समितीने उपस्थित उमेदवारांचा मुलाखती घेवुन बांधकाम विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ.मुळे स्नेहल राजेंद्र यांची निवड केलेली होती.

त्यानुसार बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी अटी व शर्ती प्रमाणे सौ.मुळे स्नेहल राजेंद्र यांची सहा महिन्याकरिता दरमहा रू.१०,०००/- या मानधनावर जा.क्र. आस्था / कंत्राटी करारबध्द नेमणूक १५३ दि.२३/४/२०१२ अन्वये बांधकाम विभागामाध्ये करारबध्द नियुक्ती करण्यांत आलेली होती. सदरची केलेली कालावधीतील करारबध्द नियुक्तीची मुदत ही समाप्त झालेली आहे.

यापुर्वी पाणी पुरवठा व बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी सहा महिन्याकरीता अटी व शर्ती नुसार दरमहा रूपये १०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती साठी वेळोवेळी वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देण्यांत आलेल्या होत्या. तथापि सदरचे दरमहा मानधन अल्प स्वरूपाचे असल्याने उमेवारांचा अत्यंत कमी प्रमाणात मुलाखतीसाठी प्रतिसाद मिळत असल्याने सदरचे दरमहा मानधन रूपये २०,०००/- पर्यत बाबतचा निर्णयाकरीता प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे जा.क्र. आस्था. १६३ दिनांक ५/६/२०१२ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३६ दिनांक १४/८/२०१२ अन्वये खालीलप्रमाणे पारित केलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा व बांधकाम विभागाकडील अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात नेमावयाच्या कनिष्ठ अभियंता या पदाचे दरमहा मानधन वाढवुन रूपये २०,०००/- (रूपये वीस हजार फक्त ) निश्चित करण्यांस मंजुरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी. असे नमुद केलेले आहे.

तरी सौ. मुळे स्नेहल राजेंद्र यांचे उपरोक्त विनंती अर्जानुसार व त्यावरील मा.प्र. शहर अभियंता बांधकाम विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र. सार्व. बांधकाम ११६० दिनांक १९/१०/२०१२ च्या अहवालाच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) या पदावर अटी व शर्ती नुसार सौ. मुळे स्नेहल राजेंद्र यांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३६ दिनांक १४/८/२०१२ च्या ठरावानुसार दरमहा रूपये २०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेबाबत निर्णय झाल्यास सदरचा प्रस्तावास पुर्व मंजुरी करीता मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख / सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- मनपाचे सार्व. बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी सौ. मुळे यांची तांत्रिक खंड देउन नियुक्ती करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ.गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे सार्व.बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरिता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी सौ. मुळे स्नेहल राजेंद्र यांची अटी व शर्तीनुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरिता दरमहा मानधन रूपये २०,०००/- (रूपये वीस हजार फक्त )या मानधनावर करारबध्द नियुक्ती करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सातपुते दिलीप नानाभाउ सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका